478

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३,

मुंबई, दिनांक १७/१२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७/(भाग-१)/विशा-६ दि.१६ डिसेंबर-२०२४

**विषय :-** आतंरजातीय/आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षिततेकरीता सुधारित मानक कार्यप्रणाली (SPO)

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७/(भाग-१)/विशा-६, दिनांक १६ डिसेंबर-२०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१६१७१६४२३३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधिक्षक
कार्यासन अधिकारी का.क्र.२१,२४

प्रत :-

अपर पोलीस महासंचालक (का.व सु.),महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.) महाराष्ट्र राज्य ,मुंबई(सस्नेह).
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु,) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षिततेकरीता सुधारित मानक कार्यप्रणाली (SOP)**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक - न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७(भाग-१)/विशा-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक – १६ डिसेंबर, २०२४.

**वाचा :-** १. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे रिट याचिका क्र.२३१/२०१०, शक्ती वाहिनी विरुध्द भारत सरकार व इतर या याचिकेतील दिनांक २७.०३.२०१८ रोजीचे आदेश.
२. उप सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दिनांक ३१.०५.२०१८ रोजीचे पत्र.
३. शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७(भाग-१)/विशा-६, दिनांक १९.१२.२०२३ तसेच दिनांक १३.०९.२०२४ रोजीचे परिपत्रक.
४. रिट पिटीशन क्रमांक ३२४८/२०२३, अंकुरकुमार भास्करकुमार दुबे वि. महाराष्ट्र राज्य व इतर या खटल्यात मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक ०९.१२.२०२४ रोजीचे आदेश.

**प्रस्तावना :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (दिवाणी) क्रमांक २३१/२०१०, शक्तीवाहिनी विरुद्ध भारत सरकार व इतर या याचिकेमध्ये दिनांक २७.०३.२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाद्वारे आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा देण्याच्या अनुषंगाने सर्व राज्यांना प्रत्येक जिल्ह्यात विशेष कक्ष (Special Cell), सुरक्षागृहे स्थापन करणेबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा देणेकरीता प्रतिबंधात्मक, उपचारात्मक तसेच दंडात्मक उपाययोजना सुचविल्या आहेत. सदर सुचनांच्या अनुषंगाने विविध घटकांच्या जबाबदा-यांमध्ये स्पष्टता यावी याकरीता संदर्भ क्रमांक ३ अन्वये मानक कार्यप्रणाली (SOP) प्रसृत करण्यात आली होती. रिट पिटीशन क्रमांक ३२४८/२०२३, अंकुरकुमार भास्करकुमार दुबे वि. महाराष्ट्र राज्य व इतर या खटल्यात मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक ०९.१२.२०२४ रोजी पारीत केलेल्या न्यायनिर्णयास अनुसरून दिनांक १३.०९.२०२४ रोजीच्या परिपत्रकामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने सुधारित सूचना खालीलप्रमाणे सदर परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत.

**परिपत्रक :-**

**१. विशेष कक्ष (Special Cell) स्थापन करणे :**

शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७(भाग-१)/विशा-६, दिनांक १९.१२.२०२३ तसेच दिनांक १३.०९.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांचे अध्यक्षतेखाली

विशेष कक्ष (Special Cell) स्थापन करण्यात आले आहेत. सदर विशेष कक्षाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक तसेच विशेष कक्षातील सदस्यांची नावे याची अद्ययावत जिल्हानिहाय माहिती पोलीस महांचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच संबंधित जिल्ह्याचे पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

**२. राज्यस्तरीय डायल-११२ हेल्पलाईन :**

आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांची सुरक्षितता लक्षात घेता डायल-११२ या आपात्कालीन प्रतिसाद यंत्रणेकडे आलेल्या माहितीबाबत गुप्तता राखण्यात यावी. आवश्यकतेनुसार जोडप्यांना हेल्पलाईनद्वारे मार्गदर्शन करण्यात यावे. तसेच सदर हेल्पलाईन मध्ये कार्यरत कर्मचा-यांना आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांकरिता उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती देण्याकरिता वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात यावे.

**३. सुरक्षागृहे (Safe Houses) स्थापन करणे :**

आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षित आवास मिळणेकरिता जिल्हाधिका-यांद्वारे खालीलप्रमाणे सुरक्षागृहाची व्यवस्था करण्यात यावी.

अ) प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय विश्रामगृहाच्या ठिकाणी आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षित आवास मिळणेकरिता एक कक्ष आरक्षित ठेवण्यात यावा.

ब) अपरिहार्य कारणास्तव (अ) प्रमाणे कक्ष उपलब्ध न झाल्यास संबंधित जिल्ह्याच्या अथवा तालुक्याच्या ठिकाणी रिक्त शासकीय निवासस्थान देण्यात यावे.

क) अनुक्रमांक (अ) व (ब) प्रमाणे व्यवस्था करणे शक्य नसल्यास खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेण्यात येऊन उपलब्ध करुन देण्यात यावे.

ड) सुरक्षागृहांच्या प्रयोजनासाठीचा खर्च सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या तरतुदींतून भागविण्यात यावा. तसेच सुरक्षागृहांचे सनियंत्रण सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत करण्यात यावे.

ई) शासकीय विश्रामगृहांचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक याची अद्ययावत माहिती सबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी. सुरक्षागृहांबाबतचा आवश्यक तपशील मा. न्यायालयात सादर करण्याची कार्यवाही सत्वर करण्यात यावी.

शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७(भाग-१)/विशा-६, दिनांक १९.१२.२०२३ तसेच दिनांक १३.०९.२०२४ रोजीच्या परिपत्रकातील तरतुदी यापुढेही लागू असतील. सदर सूचनांप्रमाणे पोलीस महासंचालक / जिल्हाधिकारी / पोलीस अधीक्षक / पोलीस आयुक्त यांनी कार्यवाही करून वेळोवेळी शासनास अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

सदर परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४१२१६१७१६४२३३२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHOK SHIVAJI NAIKWADE

Digitally signed by ASHOK SHIVAJI NAIKWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=1ab0baa8d0f5eb5c2f100c748bf97b95cbab1ae440851ad48198d8c8e1f05247, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=289064309A4417DCF339786241D3052E5DDBD6F07628BE5505318B15872CBCDC, cn=ASHOK SHIVAJI NAIKWADE
Date: 2024.12.16 17:17:43 +05'30'

**( अशोक नाईकवाडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत सर्व जिल्हाधिकारी.
५. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत सर्व महानगरपालिका आयुक्त.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत राज्य व सर्व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण.
८. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी.
९. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत).
१२. निवड नस्ती/विशा-६.